# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

४ लोकमत
पुणे, शनिवार, दि. १९ डिसेंबर २०१५

# रस्ता सुरक्षेसाठी समाजप्रबोधन

## जनजागृती रॅली : पथनाट्यांचे विद्यार्थ्यांनी केले सादरीकरण

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'रस्ता सुरक्षा अभियाना'चे आयोजन करण्यात आले होते. यात पथनाट्य, रांगोळी, निबंध, पोस्टर, वादविवाद, वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच, खेड पोलीस स्टेशनच्या सहकार्याने संपूर्ण राजगुरुनगरमध्ये रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीद्वारे समाजप्रबोधन करण्यात आले.

'नियम पाळा, अपघात टाळा', 'नजर हटी, दुर्घटना घटी' अशा अनेक घोषणा मुलांनी दिल्या. या जनजागृती रॅलीचे उद्घाटन पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांनी केले. या प्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक गणेश म्हस्के, पोलीस उपनिरीक्षक चेतन माने, मुक्तार शेख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील उपस्थित होते. पोलीस मित्र विद्यार्थ्यांनी गर्दीच्या ठिकाणी आणि रात्रीच्या वेळीही वाहतूक पोलिसांबरोबर वाहतुकीचे नियंत्रण व नियोजन केले.

या अभियानाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळुक, प्रा. मच्छिंद्र मुळुक, डॉ. महेश घाडगे, विद्यापीठ प्रतिनिधी आकाश नवरे यांनी केले. (वार्ताहर)

◆ निबंध स्पर्धेमध्ये 'रस्ता सुरक्षा काळाची गरज', 'वाहतूक समस्या-एक सामाजिक समस्या' हे विषय होते. यात प्रथम क्रमांक निकिता हंगे या विद्यार्थिनीने मिळविला. पोस्टर स्पर्धेसाठी 'रस्ता सुरक्षा काळाची गरज', 'डोंट ड्रिंक ड्राइव्ह' आणि 'वेगाची नशा, करी जिवाची दुर्दशा' हे विषय होते. यामध्ये ओंकार बोंबले, सोनल घनवट, कोमल जगदाळे या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकाविले. वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेसाठी रस्ता सुरक्षा 'वाहतुकीची समस्या, युवकांना एक आव्हान' आणि 'अपघाती मृत्यू', असे विषय होते. यात वादविवाद स्पर्धेत भूषण सांडभोर याने प्रथम क्रमांक मिळविला, तर वक्तृत्व स्पर्धेत निकिता हंगे या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला. रांगोळी स्पर्धेत काजल बोऱ्हाडे हिने प्रथम क्रमांक पटकाविला.




हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राजगुरुनगरमधून रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीद्वारे समाजप्रबोधन केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख